
Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730 AN INTERNATIONAL
MULTIDISCItPLINARY QUARTERLY RESEARCH
JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III / Hindi Part - I

IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I January - March - 2019

Marathi Part - III / Hindi Part - I

**Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

**Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | डॉ. आंबेडकर यांचा, ''बहुजन हिताय, बहूजन सूखाय'' दृष्टीकोन<br>**प्रा. डॉ. जयेश अवथरे** | १-६ |
| २ | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्रिशिक्षण विषयक कार्ये<br>**प्रा. डॉ. राजेंद्र मुर्लीधरराव झाडे** | ७-९ |
| ३ | लोक प्रतिनिधी आणि विकास कार्य (भंडारा जिल्हा विशेष संदर्भ)<br>**राहूल प्रकाश चुटे** | १०-१३ |
| ४ | समकालीन प्रश्न व भारतीय लोकशाही<br>**संदीप तुंडूरवार** | १४-१९ |
| ५ | भारतीय अर्थव्यस्थेत स्त्री सक्षमीकरणाची भूमिका<br>**डॉ. दामोदर चंद्रभानजी दुधे** | २०-२३ |
| ६ | चंद्रपूर जिल्ह्यातील मत्स्यव्यवसायात स्त्रियांची स्थिती<br>**अर्चना रामाजी मेश्राम** | २४-२९ |
| ७ | विद्यार्थ्यांची वैचारिक प्रगल्भता आणि ज्ञानमिंमासा : एक तात्विक विश्लेषण<br>**चंद्रकांत प्रल्हाद सोनवणे** | ३०-३३ |
| ८ | सामाजिक कार्यकर्ता आणि संघटन शक्ति<br>**प्रा. मनोहर आ. गुडघे** | ३४-३६ |
| ९ | स्त्रीवादी आणि महिला सक्षमीकरण<br>**सहा. प्रा. पवन द. महंत** | ३७-४२ |
| १० | महाविद्यालयातील नापास व गळती<br>**प्रो. डॉ. अवथरे जयेश मो.** | ४३-४६ |
| ११ | जातक कथांमधून दिसून येणारे तत्कालिन समजाजीवन<br>**प्रा. डॉ. निलेश एकनाथराव लोंढे** | ४७-५० |
| १२ | तुळजापूर तालुक्यातील पर्यटन स्थळांचा भौगोलिक अभ्यास<br>**प्रा. कांबळे डी. एस.** | ५१-५४ |
| १३ | भारतीय समाज : स्त्री सक्षमीकरण<br>**डॉ. रमेश एम. घोनमोडे** | ५५-५९ |




Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | उस्मानाबाद जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा अभ्यास<br>**प्रा. डॉ. सुनिल रजपूत** | ६०-६४ |
| १५ | महिला सक्षमीकरण<br>**डॉ. बी. व्ही. डोंगरे (पाटील)** | ६५-६८ |
| १६ | मतदार जागृती काळाची गरज<br>**प्रा. डॉ. नितिन बी. कावडकर** | ६९-७३ |
| १७ | समकालीन मराठी ग्रामीण साहित्यातील सामाजिकता<br>**प्रा. डॉ. परमानंद बा. बावनकुळे** | ७४-७९ |
| १८ | मराठी साहित्य आणि विनोद<br>**रश्मि मधुकरराव खैरकार (बोबडे)** | ८०-८४ |




Scanned with CamScanner

# CONTENTS OF HINDI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | पर्यावरण संबंधी हिन्दी साहित्य की भूमिका<br>**प्रा. डॉ. भारती बी. वळवी** | १-५ |
| २ | साहित्य और पर्यावरण<br>**प्रा. डॉ. लहाडे मुरलीधर अच्युतराव** | ६-१० |
| ३ | भारत मे दहशतवाद तथा नक्षलवाद एक विश्लेशण<br>**प्रा. डॉ. सुनील जी. नरांजे** | ११-१५ |
| ४ | एल. पी. जी. निती एवं भारतीय स्वतंत्रता इतिहास के परिप्रेक्ष्य में एवंम आज : एक विश्लेषणात्मक अध्ययन<br>**श्री चंद्रशेखर लक्ष्मणराव कोरे** | १६-२१ |
| ५ | पर्यावरण संरक्षण में महिलाओं की भूमिका<br>**प्रा. डॉ. भारती बी. वळवी** | २२-२६ |
| ६ | २१ वी सदी में स्त्री सशक्तीकरण की प्रासंगिता<br>**प्रा. डॉ. डमरे मोहन मुंजाभाऊ** | २७-३१ |
| ७ | पर्यावरण संरक्षण - महाकवि कालिदास<br>**डॉ. हरिनाम सिंह** | ३२-३६ |





Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)**

# ४. समकालीन प्रश्न व भारतीय लोकशाही

**संदीप तुंडूरवार**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर.

**विषय बांधणी**

मानवी जीवन विकासाच्या क्रमात मानवाला गवसलेली अत्यंत विलक्षण अशी व्यवस्था 'लोकशाहीस' मानल्या जाते. ज्ञान व्यवस्थांच्या प्रक्रियेवर वा तत्कालीन साहित्यावर नजर टाकली तरी लोकशाहीच्या मांडणीबाबत अथवा प्रत्यक्ष रितीने का होईना लोकशाहीचे कवडसे अस्तित्वात असल्याचे जाणवते. भारतातील बुध्द तत्वज्ञान त्याचप्रमाणे पाश्चात्य जगतातील ग्रीस साहित्यात त्याच्या छटा उमटलेल्या आहेत. ॲरिस्टॉटल, प्लेटो यांच्या मांडणीत लोकशाहीला बळकटी नसली तरी लोकशाहीवरील त्यांचे भाष्य दखलपात्र आहे. आपला चक्रीय सिध्दांत मांडताना त्याला लोकशाही महत्वाची व्यवस्था वाटते.[1] (पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, डॉ. भा. ल. भोळे, पिंपळापुरे पब्लीकेशन्स, नागपूर, 1997, पृ.क्र. 24)

परंतु त्याचे रूपांतरण भ्रष्ट जनतंत्रात झाल्यास व्यवस्था संपुष्टात येण्याचा तो इशारा होतो. याचाच अर्थ लोकशाही औद्योगिकीकरणाचे अपत्य नसून मानवाच्या उत्क्रांत विकसातील महत्वाची उपलब्धी होय ज्याबाबत तो इ.स. पूर्व कालखंडात विश्लेषण करतांना दिसतो. प्रदिर्घ काळानंतर सामाजिक करारांच्या पुरस्कर्त्यांनी व्यक्ती–व्यक्ती आणि व्यक्ती–समाज तद्नंतर व्यक्ती–समाज–राज्य यातील करारावर तर्कवादी समर्थन करण्यास प्रारंभ केला. त्यातून लोकशाहीच्या अवधारणांना घप्पता येऊ लागली. हॉब्ज, लॉक, रूसो या पाश्चात्य विचारवंतानी करारपूर्व व्यवहाराला उचलून धरीत पारंपारिक ईश्वर रचनेचा सिध्दांत खोडून काढला तेव्हा समतेच्या तत्वाला व सहभागाच्या समान पातळीला अधारेखित करण्यात आले.[2] (पाश्चात्य राजकीय विचारवंत, विजय देव, शरद गोसावी, संज्योत आपटे, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे, 2012, पृ.क्र. 166)

लोक अभिव्यक्तीची संकल्पना युरोपातील राजेशाही व्यवस्थेत मूळ धरू लागल्याचा तो कालखंड होता. खरं तर तत्पूर्वीच जनविचारांना (मग ते धाक दाखवून असो किंवा राजसत्तेचा आब दाखवून) राजाच्या धोरण प्रक्रियेत स्थान मिळू लागलेले होते. ब्रिटनमधील राजघराण्याची वाटचाल लोकशाहीकडे 'रक्तशून्य' क्रांतीतून घडल्याचा इतिहास सर्वश्रूत आहे. अनेक शतकाच्या वाटचालीतून उत्क्रांत होत ब्रिटीश लोकशाही उदयास आली व नंतरच्या कालखंडात इंग्रज साम्राज्यांच्या वसाहतीमध्ये लोकशाहीचा प्रयोग राबविल्या गेला. अमेरिका, भारत वगळता अन्य देशांमध्ये लोकशाहीला लोकाश्रय मिळाला नाही हे वास्तव दुर्लक्षून चालता येत नाही.

भारताला लोकशाहीचे प्रारूप नवे नव्हते याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वस्तुनिष्ठ पुरावे देत त्याची यथार्थता विशद केलेली आहे. बुध्द काळातील गणराज्याचा प्रयोग लोकसहभाग व नियंत्रण या दृष्टिने विचारात घेतल्यास लोकशाहीची पाळेमुळे रूजलेली असल्याने ब्रिटिशांच्या निर्गमनानंतर येथील लोकशाहीचा ढाचा स्थिर होण्यास अन्यन देशाच्या तुलनेत यश मिळाले. त्या यशाला चिरंतन वा शाश्वत रचनेत आणावयाचे असेल तर काय



**Scanned with CamScanner**

काळजी घेतली पाहिजे याबाबतचे निरिक्षण नोंदवितांना ते म्हणतात 'सामाजिक व आर्थिक उद्दिष्टांची परिपूर्तता करावयाची असेल तर संविधानिक व्यवस्थेच्या माध्यमातून करण्यास आता आपल्याला शिकावे लागेल. भारतात व्यक्तीपूजचे स्तोम प्रचंड आहे, त्यामुळे आता विवेकाने वागण्याचा शिरस्वा जोपासायला हवा व आपले स्वातंत्र्य महापुरूषांच्या खुंटीला बांधणे संपुष्टात आणावयास हवे. सोबतच राजकीय लोकशाहीचे रूपांतरण सामाजिक लोकशाहीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी आता आपली आहे.'[3] (राजनीति विचारक विश्वकोष, ओमप्रकाश गावा, मयुर प्रकाशन, दिल्ली, पृ.क्र. 7–8) संविधान सभेतील चर्चेला उत्तर देताना डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केलेला विचार वर्तमानात अधिक प्रस्तुत ठरताना दिसतोय. गंभीरता लक्षात न घेता सुरू असलेली वाटचाल 'निवडणूक लोकशाहीत' अंतर्भावित असली तरी प्रत्यक्षातील लोकशाहीची मांड युरोपियन रचनेप्रमाणे विकास पाहू शकली नाही. त्यामुळेच प्रारंभापासूनच भिन्न–भिन्न प्रश्नांचा सामना लोकशाहीला करावा लागतो आहे. भारताच्या शेजारी राष्ट्रात लोकशाहीचा ढाचा उभा होऊ शकला नाही या वास्तवापेक्षा भारतीयांनी लोकशाही तळापर्यंत झिरपविण्यास कितपत मदत केली आणि प्रत्यक्षातील त्याचे पडसाद काय याचा गोषवारा क्रमप्राप्त ठरतोय.

**भारतातील लोकशाहीची पाऊलवाट**

संविधानीक व्यवस्था भारतीय लोकशाहीचे मूर्त माध्यम होते. प्रजासत्ताक होतानाच काही प्रश्नांना राज्यकर्त्यांना सामोरे जाणे आवश्यकही होते. हिंसा, धार्मिकद्वेष, कश्मिर प्रश्न, दारिद्रय, निरक्षरता ही प्रश्न व्यवस्थेवर हावी ठरलेली होती. त्याचा निचरा करण्याच्या अनुषंगाने संस्थात्मक उभारणी व व्यवस्थेला आधार (वैधानिकता) प्राप्त करून देण्याचे आव्हान होते. त्यातूनच समाजवादी ढाचा, नियोजन आयोग, सामूदायिक विकास कार्यक्रम, पंचवार्षिक योजना, शेतीतील सुधारणा, आरक्षित घटकांना सुरक्षित करणाऱ्या तरतूदीची अंमलबजावणी या विभिन्न प्रयोगांना राबविण्याची एक हाती भूमिका पं. जवाहरलाल नेहरू यांनी घेतली व प्रतिकूल परिस्थितीला शांत करण्याचा प्रयत्नही केला. नेहरू मंत्रिमंडळात स्वातंत्र्याकरिता सर्वस्व त्यागून दिलेले गणमान्य नेतृत्व जसे होते त्याचप्रमाणे उच्चशिक्षित व्यक्तींचाही भरणा होता. वास्तविकता व कल्पनावाद यांच्या संमिश्रातून चालणाऱ्या शासनाला मात्र भारत–चीन युध्दाने भानावर आणलेत याच दरम्यान मुंधडा प्रकरण त्यातील कृष्ण मेनन यांची भूमिका वादग्रस्त ठरल्याने जुन्या प्रश्नांच्या बरोबरीने नव्या प्रश्नांची मालिका उभी झाली. चीन युध्दाच्या प्रचंड मानसिक ग्लानीमुळे नेहरू कालवश झालेत. हे लक्षात घेतले तर युध्दजन्य व्यवस्था लोकव्यवस्थेचा पाया उखडवू शकते वा अत्यंत दमदार बनवू शकते या वास्तववादी सत्याचे आकलन करून देणारी घटना आहे. 1971 च्या युध्दातील विजयामुळे इंदिरा गांधीचे स्थान अत्यंत मजबूत बनलेले हाते. तर सत्तात्मक दृढतेमुळे आणिबाणीचा प्रश्न, व्यक्ती केंद्रीत राजकारणाची सुरूवात, भ्रष्टाचाराला खतपाणी याबाबीही त्यांच्या स्वभाव पैलूशी जोडल्या गेल्यात. ज्योती बसूनी त्यांच्या आत्मचरित्रात नोंद करताना म्हटलेत 'भारतीय राजकारणातील सांप्रतच्या नैतिक स्वरूपाचा ऱ्हास इंदीरा गांधीच्या कारकिर्दीपासून सुरू झाला.' तो राजीव गांधीने विद्यमान राज्यकर्ते यांच्यापर्यंत वारसाहक्काने आल्याचे जेव्हा जाणवते तेव्हा लोकशाहीच्या पडझडीला व उद्‌भवलेल्या प्रश्नांना जनवर्गापेक्षा राजकीय वर्ग अधिक जबाबदेही असल्याचे स्पष्ट होते. भाषावाद, सीमावाद, भ्रष्टाचार, जातीवाद, शिक्षणातील विषमता, हक्कांवरील आक्रमणे, विलबांतील न्याय, हिसांचारी तत्वाना बळ, मूलतत्ववादाची निर्मिती, अनुनयाचे विकृत स्वरूप, धार्मिक उन्माद, अभिव्यक्तीना संपुष्टात आणणाऱ्या कृती, व्यक्तीहिताचे दमन या सर्वांच्या पायाभूत धारणा राजाश्रयात प्रसंगोपात उद्‌भवलेल्या आहेत त्यामुळेच व्यवस्थेच्या



**Scanned with CamScanner**

सिध्दतेचा मुद्दा अधिक ज्वालाग्राही जाणवतो. म. गांधी लोकशाही संदर्भात विवेचन करताना म्हणतात 'बलवाना ऐवढीच संधी कमकुवत असणाऱ्यालाही उपलब्ध करून देणे होय, हे अहिंसेशिवाय साध्य करणे शक्य नाही. जोपर्यंत सर्वजण सत्तेत सहभागी होत नाही तोवर लोकशाही निर्माण होणे शक्य नाही.'[4] (समकालीन राज्यशास्त्र, संपा, डॉ. प्रकाश पवार, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे, 2012, पृ.क्र. 4)

**समकालीन प्रश्नाच्या अंतरंगात**

प्रत्येकच देशाच्या वाटचालीत जे प्रश्न उपस्थित होतात त्या प्रश्नांना भारतालाही सामोरे जावे लागले तसेही यात विशेष मानावे असे नसते परंतु 1970 च्या दशकानंतर संविधानिक व व्यवस्थेच्या प्रश्नांना कुतरण्याचे काम ज्या प्रश्नांनी सुरू केलेत त्यामुळे व्यवस्थेच्या दृढतेवरच शंकांना वाव घेण्यास प्रारंभ झाला. आणिबाणी त्यातून आलेले माध्यमजगत व व्यक्तीस्वातंत्र्यावरील कात्री यामुळे नव्या समस्या अन् त्या संदर्भातील चर्चेचा उहापोह सुरू झाला. याच दरम्यान वादाचा मुद्दा घराणेशाहीचा उपस्थित होऊन तो लोकशाहीवर कशी कुरघोडी करीत आहे याबाबत जनमानसात प्रतिबिंबित करण्यास सुरूवात झाली. नुकतेच राहूल गांधी काँग्रेसच्या अध्यक्ष पदावर आल्यानंतर सत्ताधाऱ्यांचे बळ अधिक चेतविल्या गेलेत. 'काँग्रेस आणि गांधी' व 'काँग्रेस–गांधी आणि भ्रष्टाचार' याबाबत सामान्य जनतेत केलेल्या पेरणीमुळे लोकशाही उध्दस्त होत असल्याचा प्रतिवाद समकालीनातील राजकारणात उद्‌भवलेला आहे. वस्तुतः अमेरिका, रशिया, पाकिस्तान, श्रीलंका, बांग्लादेश, नेपाळ या देशांमध्ये घराणेव्यवस्थेने आपली मांड घप्पपणे रोवली आहे. भारतात आज जे टिकाकार म्हणून सामोरे आलेले आहे त्यांच्याकडे डोकावल्यास घराणेशाही सार्वत्रिक मुरल्याचे स्पष्ट होते. भारतात घराणेशाही ही सर्वपक्षीय असल्याने तो सत्तरच्या दशकापासून विडंबनाचा ठरलेला मुद्दा मात्र लोकशाहीला बाधीत करणारा नाही हे जनतेच्या निर्वाचन शिक्कामोर्तबातून स्पष्ट झालेले आहे. भारतीय रचना व्यक्तीपूजेच्या निदंक ठरलेल्या नसल्याने लोकशाहीत तो स्थिरस्थावर झालेला आहे.

लोकशाही निर्वाचनाच्या पायावर उभी असल्याचे सामान्य व अभिजनाना निवडणूकीतून होणारे सत्तांतरण लोकशाहीच्या सामर्थ्याचे प्रतिक वाटते. त्यामुळेच 1975 चा आणिबाणीचा कालखंड येऊन सत्तातंरातीत लोकशाहीवर मात्र गाढ विश्वास बसलेला आहे. निर्वाचनाची प्रक्रिया संमोहक असल्यामुळेच त्या–त्या कालखंडात 'पेरणीच्या' वाक्यांना अतिमहत्व आल्याचे दिसून येते. यामधून मात्र लोकानूनय व त्यांना आपलेसे करण्यासोबतच 'खिल्ली उडविणारी' शब्दरचना योजून जाहिर द्वेष वा विरोधकांप्रती असूया निर्माण करणारी कृती अवलंबिल्या जातांना दिसते हे केवळ भारतातच घडलेले नाही तर जगभरातच अशा शेलक्या शब्दरचनाना वा ठसठसीत शब्दांना महत्व आलेले आहे. विद्यमान सोशल मिडीयातून याचा वापर व्यक्तीद्वेषाच्या पराकोटीच्या भावनांकडे होत असताना दिसत आहे. ट्रोल करणे यातीलच एक नव्या उत्पत्तीचा भाग होय. नेहरू, शास्त्री कालखंडापासूनच लोकानूनय करणाऱ्या रचनांची पेरणी होऊ लागली 'हिंदी–चीनी भाई भाई', 'जय जवान–जय किसान', 'गरिबी हटाव' 'भ्रष्टाचार मुक्त देश', 'देश की सत्ता पिछडा पावे', 'भूकमारीशी लढा', 'शाश्वत विकास', 'शायनिंग इंडिया', 'अच्छे दिन' या विभिन्न त्याच्या आवृत्या होय. तर दुसऱ्या बाजूला सैतान, खुनीपंजा, मौत का सौदागर, गोरी चमडी, देशद्रोही, या विभिन्न शब्दातून जनमानसात द्वेषाच्या भिंती उभ्या केल्या जात असल्याने सामाजिक एकतेच्या अभिसरणाला धक्का पोहचला असून लोकशाहीच्या जीवंत एकात्म समूह रचनेला मात्र त्याने बाधित केले आहे. बरेचदा एखादे शस्त्र जितके घातक ठरू शकत नाही तेवढा मात्र शब्द प्रहराने घडून येतो. हिटलर, माओ, लेनीन, जीना हे त्याची प्रातिनिधीक उदाहरणे होत. भारतात



Scanned with CamScanner

वेदकालखंडानतर शस्त्र न वापरता ग्रंथप्रामाण्यांना प्रमाण मानून जे सामाजिक अभिसरण घडविण्याकरीता हिंसाचाराला उत्तेजीत केले त्याचे प्रारूप व पडसाद पाहता राजकीय कृती सोबतच शब्दांचे बुडबुडे समूह व्यवस्थेच्या अधःपतनास जबाबदार असल्याचे सप्रमाण दाभोळकर, पानसरे, वुलबुर्गी, गौरी लंकेश यांच्या हत्येने घडविले आहे.

मिल वा अन्य लोकशाही समर्थकांना अल्पसंख्याकाची जी व्याख्या अभिप्रेत होती ती औद्योगिकीकरणापासूनच खरे तर मोडीत निघाली होती. मिल अल्पसंख्याकाचे असणारे एक मत सुध्दा लोकशाहीत गृहित धरले जाते असा म्हणायचा तो संदर्भ इतरांपासून भिन्न मत, जात, भाषा, धर्म, या आधारावर अवलंबून होता. मात्र नव्या रचनेत निर्वाचनाकरीता बहूसंख्य पाठिंबा लक्षात घेतला जात असला तरी अंतिम सूत्रे मात्र भांडवलवादी व्यवस्थेच्या हातात गेलेली आहे. जगातील अग्रमानांकित अशा 267 अर्थघराण्याकडे जगाची 78 प्रतिशत संपत्ती केंद्रीत झालेली आहे. भारत 9 अर्थघराण्याच्या बळावर रेटल्या गेलेला आहे. त्यातून शोषण, विषमता ऐवढया मोठया प्रमाणात वाढली की लोकशाहीचे मूळ संदर्भ हिरावल्या गेलेत. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात काँग्रेस व उजव्या विचारांना बळ देणारे अर्थघराणीच होती. त्यांच्या प्रभावाची उपस्थिती वाढल्यानंतरच आंदोलन व दुसऱ्या बाजूला मूलतत्ववाद वाढीस लागल्याची जी टिका केली जाते तिला दुर्लक्षिता येत नाही. भांडवली व्यवस्था त्यातून उद्‌भवलेली बाजारपेठीय मानसिकता तिच्यातून होणारा लोकशाही मूल्यांचा ऱ्हास यावर आपली मते नोंदवितांना म. गांधी म्हणतात 'जागतिकीकरणामुळे परस्परवलंबनापेक्षा परावलंबन वाढीस लागले. भांडवली शक्तीनी आतापर्यंत दारिद्रय, बेरोजगारी, पर्यावरणाचा ऱ्हास, दमन व शोषण यांना गती दिली. बडया श्रीमंत राष्ट्राचे व्यापारी गट तयार होत आहे. 'हव्यास' हे भांडवलशाहीचे प्रतिमान असल्याचे गांधी म्हणत त्यामुळे प्रथमतः हे बदलावयाचे असेल तर तळातील माणसांचा पहिले विकास व त्यानंतरच आर्थिक स्रोताची वृध्दी व विनयोग करायला पाहिजे.'[5] (म. गांधीची विचारसृष्टी काही अलक्षित पैलू, यशवंत सुमंत, साधना प्रकाशन, पुणे, 2016, पृ.क्र. 83)

भांडवली व्यवस्था हिंदूतील वर्णव्यवस्थेच्या वैश्य वृत्तीशी संबंधित आहेत ती संबंध रचनात शोषणावर अवलंबून असल्याने समतेचा मुडदाच पडलेला असतो. स्वामी विवेकानंदानी वैश्य वृत्तीवर हल्ला चढविलेला आहे ते म्हणतात "It is a aweful in its silent crushing and blood sucking power" त्या सत्तेजवळ दुसऱ्याला कळू न देता चिरडल्यावचे व रक्तशोषणाचे भयंकर सामर्थ्य असते.[6] (गांधी नावाचे महात्मा, 'राय किणीकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2012, पृ.क्र. 40) भांडवली व्यवस्था लोकशाहीला पुरक ठरतीलच असे म्हणता येत नाही. समर्थकांच्या मते विज्ञानदृष्टी व तिचा प्रसार मोठया प्रमाणात होण्यास सहाय्य होत असल्यान त्यातून स्वातंत्र्य, अभिव्यक्ती यांची जोपासना होण्यास वाव मिळतो. थोडया वेळाकरीता ही भूमिका ताज्य मानली तरी भांडवली व्यवस्थेच्या रूपडयांनी मानवी जीवनाला आवश्यक मुल्ये कमी दिली तुलनेत जीवनव्यवस्थेच्या ऱ्हासाकडे ती घेऊन गेलेली आहे. नववसाहतवाद व आधुनिक भारत या ग्रंथरचनेत प्रा. गोपाळ राणे म्हणतात, राजघराण्याकडे सर्वोच्च सत्ता जोपर्यंत होती तापर्यंत त्यांची शक्ती मर्यादित होती परंतु वैश्यवृत्तीच्या भांडवली व्यवस्थेकडे सूत्रे आल्यानंतर मात्र साम्राज्यवाद अथवा वसाहतवाद फोफावला व त्यातून मानवी दमनाला प्रारंभ झाला.[7] (नववसाहतवाद व आधुनिक भारत, प्रा. गोपाळ राणे, कालिंदी प्रकाशन, ठाणे, 1995, पृ.क्र. 8) भांडवली व्यवस्था सत्ता आणि संपत्तीला केंद्रीत करतात व त्यावर प्रभूत्व निर्माण करतात हे तत्व सर्वसमावेशी प्रमेयालाच नकार देणारे असल्यामुळे लोकशाहीच्या



Scanned with CamScanner

समकालीन प्रश्नात प्राधान्याने विचार करावा असे ठरले आहे. धर्म, अस्मिता, संस्कृती, यांना बाजारू स्वरूप देण्याचे प्रभावी कार्य भांडवली व्यवस्थेने केलेले असून सामान्य वर्गालाही त्याने मोहित केले आहे. द्वेषाचा ज्वर पेरण्याचे व पोसण्याचे कार्य बाजारवाद जेव्हा करतो त्यावेळी पारस्पारिक लढाया लढविण्याकरीता शस्त्रास्त्रांचा वापर त्याला सार्वत्रिक करण्याचा उद्योग होतो आणि जगातील सुस्थिर प्रणालीला विनाशाच्या गर्तेत ढकलविण्याकरीता आपल्या कुटीलतेत यशस्वी ठरत असल्याचे चित्र सार्वत्रिक व बोलके आहे.

**निर्वचन**

प्रजासत्ताकाच्या वाटचालीत लोकशाहीला आलेले चढ–उतार बघताना साधारणतः तिच्या वर्तमान व नजीकच्या भविष्याविषयी चिंता व्यक्त करावा असा एकूणच कालपट आहे. विशेषतः उजव्या विचारांच्या उन्मादाला जेव्हा लोकाश्रय मिळू लागतो त्यावेळी प्रश्न भयावह बनतात. व्यक्ती जीवनाच्या विकासाभिमूख पैलूऐवजी धर्म, श्रध्दा, पंरपरा, संस्कृती, जन्मश्रेष्ठत्व, वर्णता याबाबतच्या पोकळ परंतु धारधार आणि वखवखलेल्या विचारांना बरे दिवस येऊ लागतात तेव्हा व्यक्ती, त्याची प्रतिष्ठा, सहिष्णूता यांचा बळी जाऊ लागतो. खाणे–पिणे, विंचरणें, विचार मांडणे, कलाकृती सादर करणे, मानवियता दर्शविणे यांच्याबाबत राज्य वा झुंडीचे मानसशास्त्र दमनात्मक प्रवृत्तीला उचलून धरू लागतात. त्यावेळी लोकशाहीचे गमत्व नामशेष होण्याचा संभाव्य धोका उदयास येतो. समकालीन भारत या पठडीतला बनू पाहत आहे त्यावेळी निश्चितच चिंतनाची गरज आधिक्याने भासू लागते. शतकभरापूर्वीच या संदर्भात मांडणी करतांना स्वामी विवेकानंद म्हणतात, समाजसत्तावाद, अराज्यवाद, नास्तिवाद इ. विचार प्रणालीची निर्मिती सामाजिक क्रांतीचा परिपाक आहे. शुद्र वर्गात भान निर्माण झाल्याने या विचारधारा प्रभावी होत आहेत. एखाद्या समाजाच्या सर्व घटकांना संपत्ती, शिक्षण अथवा ज्ञान मिळविण्याची समान संधी असली पाहिजेत. सर्व बाबतीत स्वाधिनता असणे म्हणजेच मुक्तीच्या रोखाने प्रगती होणे होय.'[8] (जाती, संस्कृती आणि समाजवाद, स्वामी विवेकानंद, रामकृष्ण मठ, नागपूर, 2009, पृ.क्र. 10) स्वामी विवेकानंदाच्या मांडणीत लोकशाहीचे तत्व पूर्णतःया सामावलेले आहे. वर्तमानात मात्र स्वामी विवेकानंद सोयीच्या स्वरूपात स्विकारल्या जात असल्याने मूलभूत तत्वांनाच हरताळ फासल्या जात आहे. श्रध्दा, धर्म यांच्या बाजारवादाचे भांडवलीव्यवस्थेला टेकून उजागर होत चालल्याने भारतासह सर्वच लोकशाही देशांमध्ये समुहाची रचना द्वेषावर पोसल्या जात आहे. अशा वातावरणात लोकशाहीची वाताहात होणे संभवनिय ठरते. दि. के. बेडेकरांनी या संदर्भातील इशारा पूर्वीच दिलेला आहे. 'धर्मश्रध्दा साधन बनून राष्ट्रीय अस्मिता व राजकीय सत्तालोलूप संघर्ष यांच्या गदारोळात गुरफटून गेलेली आहे. श्रध्देचे मूळ स्वरूप ती केव्हाच गमावून बसलेली आहे.'[9] (धर्म, धर्मश्रध्दा आणि अंधश्रध्दा, वसंत पळशीकर, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, 2005, पृ.क्र. 14) युरोपीयन व्यवस्थेत धर्मवादाचा कालखंड मध्ययुगीन रानटी मानसिकतेचा मानल्या जातो. जगाची वाटचाल सध्या तरी त्याच मार्गाने मार्गक्रमणा करीत आहे. लोकशाहीव्यवस्था अंधुकशा आशेचा किरण होत्या परंतु लोकशाहीचा सोंगा पकडून केंद्रित मानिसकतेच्या नेतृत्वानी अधिनायकवाद रूजविण्याचा जो प्रयत्न सुरू केलेला आहे, त्या प्रयत्नाला ज्या प्रश्नांनी हातभार लावला त्याने समकालीन संदर्भ काळवंडल्या जात आहे. विवेकाचा लोप होण्याच्या कडेवर येऊन भारतीय समाज थांबल्यास उत्तर वैदिक कालखंडातील प्रतिक्रियावादी समाजाची त्वरेने उभारणी होईल व महत्त प्रयासाने उभ्या केलेल्या सर्वहितकारक लोकशाहीचा गळा आवळल्याशिवाय राहणार नाही. विवेकानंद, फुले, गांधी,



Scanned with CamScanner

आंबेडकर यांच्या विचारातील मानवी जीवनाची शाश्वत मूल्ये अंगभूत रचनेने बाळकणे व त्यावर वाटचाल करणे यावरच भारतातील लोकशाहीचे भवितव्य अवलंबून राहिल.

**संदर्भग्रंथ**

१. पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, डॉ. भा. ल. भोळे, पिंपळापुरे पब्लीकेशन्स, नागपूर, 1997, पृ.क्र. 24

२. पाश्चात्य राजकीय विचारवंत, विजय देव, शरद गोसावी, संज्योत आपटे, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे, 2012, पृ.क्र. 166

३. राजनीति विचारक विश्वकोष, ओमप्रकाश गावा, मयुर प्रकाशन, दिल्ली, पृ.क्र. 7–8.

४. समकालीन राज्यशास्त्र, संपा, डॉ. प्रकाश पवार, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे, 2012, पृ.क्र. 4

५. म. गांधीची विचारसृष्टी काही अलक्षित पैलू, यशवंत सुमंत, साधना प्रकाशन, पुणे, 2016, पृ.क्र. 83.

६. गांधी नावाचे महात्मा, 'राय किणीकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2012, पृ.क्र. 40.

७. नववसाहतवाद व आधुनिक भारत, प्रा. गोपाळ राणे, कालिंदी प्रकाशन, ठाणे, 1995, पृ.क्र. 8

८. जाती, संस्कृती आणि समाजवाद, स्वामी विवेकानंद, रामकृष्ण मठ, नागपूर, 2009, पृ.क्र. 10

९. धर्म, धर्मश्रध्दा आणि अंधश्रध्दा, वसंत पळशीकर, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, 2005, पृ.क्र. 14



**Scanned with CamScanner**